


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २२६ वा शुक्रवार दि ३१ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार म्हणजे हमाम में सब x x x....

## केंद्रीय आयुष्य मंत्री ना.जाधव व आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य ना.आबीटकर या प्रकरणाकडे आपले लक्ष केव्हा केंद्रित करणार...




**बुलडाणा येथे बहुचर्चित वादग्रस्त मागील काळात नियमबाह्य कार्यरत बडतर्फ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे राहणार गोरक्षण रोड परिसर अकोला यांच्यावर करोडो रुपये साहित्य व उपकरणे खरेदी प्रकरणात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रेमचंद पंडित, डॉ नितीन तडस डॉ.सुभाष चव्हाण व प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक व संबंधित विभागातील अधिकारी यांच्या विरोधात झालेल्या शेकडो तक्रारींची कशी वाट लावण्यात आली तसेच आलेल्या करोडो रुपयांचा निधी कसा कागदोपत्री खर्च शासनाचा करोडो रुपयांचा जीएसटी न भरता खोटे बिले काढून खर्च दाखवण्यात आला या संपूर्ण प्रकरणातील संबंधित अधिकारी व ब्लॅक लिस्ट मध्ये असलेले व आजही कार्यरत त्या कंत्राटदारांची पोलखोल पुढील भागात**

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर गाजत असलेल्या बुलडाणा येथील जिल्हा रुग्णालयाच्या भ्रष्टाचारासंदर्भात बोलायचे झाले तर हिंदीतील म्हण हमाम में सब ही अगदी चपखल बसते. कारण भ्रष्टाचार करणारे कर्मचारी असो की कनिष्ठ अधिकारी या सर्वांनी वरिष्ठ अधिकारी म्हणजे वैद्यकीय अधीक्षक,तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक किंवा त्याहूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पद्धतशीरपणे अंडरस्टँडिंग (म्हणजेच मराठीत साटेलोटे) करून एव्हढा सफाईदार भ्रष्टाचार केला की, आपण सारे भाऊ शासनाचा पैसा सर्व मिळून खाऊ परंतु या नालायकाना ही माहिती नव्हती की आपण केलेल्या सर्व भानगडी पुराव्यानिशी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या हाती लागली असून त्यांच्या पुढाकारातून या भ्रष्टाचाराला कमीत कमी वाचा तरी फुटू शकली व त्यांच्या व तक्रारकर्ते चंद्रकांत खरातांच्या पाठपुरावया मुळे ही सर्व पोलखोल झाली, अन्यथा तेरी भी चूप,मेरी भी चूप अशी स्थिती या भ्रष्टाचाराबाबत होती. येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार खरंच अगदी आगळावेगळा ठसा आहे. या ठिकाणी कोण्या एका अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने भ्रष्टाचार केलेला नाही. येथे स्थिती दाल में काला नहीं, पूरी दाल ही काली है अशी आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये साहित्य व उपकरणे खरेदीत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला. सुरवातीला अत्यंत आतल्या आत गुप्तपणे सुरू असलेल्या या शेकडो कोटींच्या भ्रष्टाचाराचा भंडाफोड दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने केला आणि या भ्रष्टाचाराला अक्षरशः कंठच फुटला.यानंतर या भ्रष्टाचाराला माजी मंत्री राजेंद्र शिंगणे व बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड चिखली आमदार महाले यांनी थेट विधानसभेत नेऊन हा भ्रष्टाचार राज्यस्तरावर उघड केला.या लोकप्रतिनिधींच्या आरोपांनुसार हा घोटाळा तब्बल ९९ कोटी रुपयांचा आहे.परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या सूत्रांची माहिती आहे की, हा घोटाळा त्याहूनही कितीतरी पटींनी जास्त आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण भ्रष्टाचार झालेला आहे, हा आता केवळ आरोप राहिला नाही. शासनाने आजवर ज्या काही समित्या नेमल्या त्या समित्यांच्या अहवालात आणि लेखापरीक्षणात हे सिद्ध देखील झालेले आहे. तरीही वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी येतात, चौकशी केल्याचे नाटक करतात, खाण्यापिण्याची ? मौजमजा करतात आणि येथून निघून गेल्यानंतर भ्रष्टाचाराचे अहवाल उघड होत नाहीत, कुठलीही कारवाई होत नाही. या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या प्रकरणात केवळ आणि केवळ एका बहुचर्चित बडतर्फ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम उच्च प्रभू गोरक्षण रोड परिसर अकोला अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती त्या नंतरही आमचा पाठपुरावा सुरू असल्याने व भ्रष्टाचाराची शेकडो कोटी रुपयांची शासनाची फसवणूक सिद्ध झाल्यावर तो वादग्रस्त भांडारपाल प्रकाश बोथे याला बडतर्फ करण्यात आले. यापेक्षा जास्त यात काहीही करण्यात आलेले नाही. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे गेल्या काही वर्षांत जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसह अगदी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांपर्यंत सर्वच जणांनी डुकराप्रमाणे स्वतःला या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत यथेच्छ डुंबवून घेतले होते, त्यामुळे या ठिकाणी झालेला भ्रष्टाचार सामूहिक व संगनमताने झाला आहे, त्यामुळे खरे तर हा संगठित गुन्हेगारीचा प्रकार आहे. त्यामुळे या सर्व कर्मचारी, कनिष्ठ अधिकारी व तत्कालीन व प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सकांपर्यंत सर्वांवरच मोक्का अंतर्गत कारवाई केली वावगे ठरणार नाही. या भ्रष्टाचारात २०२२-२३ मध्ये या ठिकाणी कार्यरत असलेले जिल्हा शल्यचिकित्सक तर एव्हढ्या गेंड्याच्या कातडीचे होते की, या भ्रष्टाचारासंदर्भात योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून वारंवार प्राप्त झाल्यानंतर देखील त्यांनी कारवाई केली नाही. यावरून स्पष्ट आहे की, हा तत्कालीन व प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सकांचा ढिसाळपणा नाही, तर हा जाणुनबुजून केलेला गंभीर प्रकार आहे. वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवणारा एव्हढा नालायक व बेशरम अधिकारी बुलढाणा जिल्हा रुग्णालयाने यापूर्वी खचितच पाहिला नसेल.बरं विशेष म्हणजे या भ्रष्टाचारातून जमवलेली प्रचंड अशा कोट्यवधी रुपयांच्या पैशांमधून या अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी संपत्ती घेऊन ठेवली आहे. भ्रष्टाचारातून मिळवलेली ही संपत्ती अवैध तर आहेच, परंतु अनैतिक देखील आहे. परंतु या महाभ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी या ठिकाणचे अधिकारी हे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी जिवाचा आटापीटा करीत असल्याचे दिसून येत आहे. चौकशी समित्याही आपले काम चोखपणे बजावताना दिसून आले नाही. कारण त्या केवळ येतात चौकशी करतात आणि निघून जातात. नंतर त्या चौकशांचे काय झाले, चौकशी अहवालांच्या भेंडोळीचे पुढे काय झाले, याची कसलीही माहिती ही जनतेला प्राप्त होत नाही. यावरून हे संपूर्ण भ्रष्टाचाराचे प्रकरण मॅनेज करण्यासाठी अगदी वरतून जोरदार प्रयत्न होताना दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींच्या लक्षवेधीवर केवळ चौकशांची नाटके केली गेली आहेत. अधिकारी येतात, ओल्या मेजवानीवर यथेच्छ ताव मारतात, जाताना कसलीतरी पार्सले घेऊन जातात. यापुढे जाऊन मात्र कोणताही अहवाल समोर येत नाही आणि कोण्या भ्रष्ट अधिकाऱ्यावर काय कारवाई झाली, याची माहिती मात्र कधीच समोर येत नाही.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनसारखी जनतेसाठी सातत्याने लढणारी वृत्तपत्रे आणि काही सामाजिक संघटनांचे पदाधिकारी या भ्रष्टाचाऱ्यांविरोधात आवाज उठवतात. सध्या सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात हे या भ्रष्टाचाविरोधात लढणारे योद्धे आहेत. त्यामुळे काही प्रमाणात का होईना परंतु या भ्रष्टाचारासंदर्भात सातत्याने चर्चा होत राहते. आगामी काळात यासंदर्भात योग्य ती कारवाई झाली नाही, आणि भ्रष्टाचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्या आली नाही, तर आगामी काळात आणखी जोरदार प्रयत्न केले जातील, असे मत त्यांनी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनशी बोलताना तक्रारकर्त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे दैनिक जनसंचलन भ्रष्टाचारविरोधातील आपल्या लढाईला आणखी गतिमान करण्यासाठी प्रयत्न करीत राहणार आहे. जोपर्यंत दोषी भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधत ठोस कारवाई केली जात नाही, तो पर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कधीही मागे हटणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# अवकाशातील शक्तिशाली डोळा

संपादकीय लेख

इस्त्रो आणि नासा या दोघांनी मिळून अवकाशात सोडलेला निसार म (नासा-इस्त्रो सिंथेटिक ॲपर्चर रडार) हा उपग्रह म्हणजे वसुंधरेवर अखंड लक्ष ठेवणारा, बारीकसारीक बदल टिपणारा, लहानातली लहान घडामोड ताबडतोब अचूकपणे नोंदविणारा एक खबऱ्याच आहे. पृथ्वीवरच्या दोन टोकांवर असणाऱ्या देशांनी एकत्र येऊन त्याची निर्मिती केली आहे आणि संपूर्ण मोहीमसुद्धा ते एकत्रच राबवणार आहेत. परवाच्या ३० जुलैला अवकाशात झेप घेतलेला हा उपग्रह, आत्ता पृथ्वीपासून ७३७ किमी अंतरावर आहे. त्याला आता ७४७ किमी अंतरावर न्यायचे आहे. हे काम करायला ४५ ते ५० दिवस लागतील. एकदा तो अपेक्षित स्थानी पोचला की त्याच्यावरचे रडार कार्यान्वित करण्यात येतील. त्यानंतर ते आपले काम सुरू करील. पृथ्वीवरची जमीन, पाणी, बर्फ यावर घडणाऱ्या घडामोडींची माहिती गोळा करत राहील. पर्यावरणात होणारे बदलही हा उपग्रह टिपेल. मुख्य म्हणजे पृथ्वीवरील हवामान कसेही आणि कितीही पालटले, तरीही या उपग्रहाची नजर ते सारे अडथळे पार करून आरपार जाईल आणि जमिनीवर काय चालले आहे, त्याची नोंद करत राहील. पृथ्वीवर सतत बदल घडत असतात. या बदलांमधील काही नैसर्गिक असतात तर काही माणसामुळे होत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये माणसाची वस्ती ङ्गधोकादायकफ म्हणता येईल, अशा जागीसुद्धा होऊ लागली आहे. धोकादायक म्हणजे कोणती ठिकाणे? तर हवामानातील बदलांमुळे सागराची सरासरी पातळी वाढत आहे. या वाढत्या पातळीचा ज्या सागर किनाऱ्यांना फटका बसणार आहे, अशा किनाऱ्यांनजीकही मानवी वस्ती झाली आहे. मुंबई आणि परिसराकडे नजर टाकली तरी याचे प्रत्यंतर आपल्याला येते. अशा ठिकाणांसोबतच भूकंपप्रवण जागा, भूस्खलन होण्याची शक्यता असणारी ठिकाणे, अशा जागांवर हा उपग्रह नजर ठेवेल. अशा ङ्गधोकादायकफ ठिकाणांमध्य होत असलेले बदल टिपण्याची, त्याबाबत अधिकाधिक माहिती गोळा करण्याची आता नितांत गरज आहे. किनारपट्टीवर होणारे बदल, समुद्रातील विविध प्रवाह, समुद्रावरील वाऱ्याची गती, समुद्रात होणारी तेलगळती या घटकांची माहिती गोळा करण्याचे कामही निसार करील. पृथ्वीवरील बर्फाळ प्रदेश, ध्रुवीय प्रदेश, हिमाच्छादित पर्वत या साऱ्यांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये बदल होत आहेत. अलीकडच्या काळात हे बदल अधिक वेगाने होत आहेत. या बदलांचे संभाव्य परिणाम भीषण असतील. ते टाळावयाचे, तर या सर्वच भागांत सतत होणारे बदल टिपणे आणि त्याबाबतची माहिती अद्ययावत करत राहणे महत्त्वाचे आहे. याचे कारण त्यातूनच आपल्याला ङ्गउद्या काय होऊ शकेलफ याची नीट कल्पना येईल आणि संभाव्य दुष्परिणाम टाळण्यासाठी वेळीच हालचाली करता येतील. थोडक्यात काय, तर हा उपग्रह आपल्या पृथ्वीच्या भूपृष्ठाची, त्यावरील पाणी आणि बर्फ यांची माहिती देत राहील. मुख्य म्हणजे दक्षिण ध्रुवावरील बदलांची माहिती मिळत राहील. निसारफद्वारे मिळणाऱ्या या माहितीमुळे संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटे यांच्याशी सामना करण्यासाठी आवश्यक ती तयारी करणे संबंधित देशांच्या सरकारांना शक्य होईल. तसेच हे धोके टाळण्यासाठी काय करता येईल, याचा विचार करून आवश्यक त्या हालचाली करता येतील. उदाहरणार्थ, भूकंपप्रवण भागाची माहिती ङ्गनिसारफमुळे सतत मिळत राहील. त्यामुळे तेथील भूकवचाच्या हालचालींचा अभ्यास करता येईल. त्या अभ्यासातून भूकवचात होणारे बदल समजू शकतील. भूकंपांप्रमाणेच ज्वालामुखींचा उद्रेकही संहारक ठरू शकतो. ज्वालामुखींच्या बदलांतील माहितीमुळे त्यांच्या उद्रेकाचा अंदाज बांधणे शक्य होईल. प्रदूषण आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम, जागतिक पातळीवरच हवामानात होत असलेले बदल आणि त्याचे जागोजागी दिसू लागलेले परिणाम या गोष्टी आता नवीन नाहीत. पर्यावरणीय माहिती गोळा करत राहणे आणि त्याचा अभ्यास करणे हा संभाव्य धोके टाळण्याचा एक मार्ग आहे. अशी उपयुक्त माहिती सतत मिळत राहणे यापूर्वी अशक्य होते; पण आता ङ्गनिसारफ हे काम करणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलांचे महत्त्व खूपच मोठे आहे. तर या वनांचा, तेथील बदलांचा, तेथील घडामोडींचा, माणसाच्या उपद्व्यापांचा वेध आता घेता येणार आहे. अगदी घनदाट अरण्याचाही, म्हणजे भर माध्यान्हीला जिथे सूर्याचे किरण भूमीला स्पर्श करू शकत नाहीत, अशा ठिकाणाचासुद्धा वेध घेणे ङ्गनिसारफकडच्या एल बँड रडारमुळे शक्य होणार आहे. तर एस बँड रडारमुळे जगभरातल्या शेतीवर, तेथील पिकांवर लक्ष ठेवता येणार आहे. निसार हा २३९२ किलो वजनाचा उपग्रह, अमेरिकेची नासा आणि भारताची इस्त्रो या अवकाश संशोधन करणाऱ्या दोन संस्थांच्या सहकार्याने तयार झाला आहे. या मोहिमेसाठी नासाने सुमारे ११६ कोटी अमेरिकी डॉलर, तर इस्त्रोने नऊ कोटी अमेरिकी डॉलर खर्च केले आहेत. पृथ्वाीवरची जमीन, तिथली वनराजी आणि बर्फाळ प्रदेश यांच्यामध्ये होत असलेल्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी अवकाशात उपग्रह पाठविण्याची आवश्यकता आहे, अशी कल्पना सन २००७ मध्ये पहिल्यांदा अमेरिकेने मांडली. पृथ्वीच्या भूकवचात होणाऱ्या बदलांचा मागोवा घेत राहिले, तर तर त्याचा फायदा भूकंपांचा, भूस्खलनांचा, ज्वालामुखींचा अभ्यास करताना होईल. हा अभ्यास आपल्याला हवामानातील बदल, जागतिक पातळीवरील कार्बनचे चक्र, वृक्षसंपदा, हिमाच्छादित प्रदेश यांच्या सखोल अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल, असे नासाचे म्हणणे होते.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बड्या नेत्याला एका जुन्या प्रकरणात सात वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा...

**रायगड :** अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे घडलेल्या १२ वर्षांपूर्वीच्या मारामारी प्रकरणाचा निकाल आज (गुरुवार) जिल्हा व सत्र न्यायालय, अलिबाग (रायगड) यांनी दिला. या प्रकरणात भाजपमधून काही महिन्यांपूर्वीच शिंदे गटात प्रवेश केलेले माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप उर्फ छोटम विठ्ठल भोईर यांच्यासह एकूण २१ आरोपींना सात वर्षांची सक्तमजुरी व प्रत्येकी तीन हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या निकालामुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूम ीवर शिंदे गटाला मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे.काँग्रेस कार्यकर्त्यांवर हल्ला करणारे रायगड जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती दिलीप भोईर उर्फ छोटम आणि त्यांच्या साथीदारांना नोव्हेंबर २०१२ मध्ये अटक करण्यात आली होती. जिल्हा परिषदेचा सभापती असताना पोलीस कोठडीत जाणारे भोईर हे रायगड जिल्हा परिषदेचे पहिले सभापती ठरले होते.११ सप्टेंबर २०१२ रोजी चोंढी येथे किरकोळ वादातून काँग्रेसचे विजय थळे, त्यांच्या पत्नी रूपाली थळे आणि इतर काँग्रेस कार्यकर्त्यांना शेकापचे दिलीप भोईर आणि त्यांच्या साथीदारांनी मारहाण केली. याप्रकरणी म ांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर तब्बल पावणेदोन महिने दिलीप भोईर उर्फ छोटम हे पोलिसांना





गुंगारा देऊन बाहेर होते. उच्च न्यायालयानेही त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिल्यानंतर छोटम जिल्हा न्यायालयाला शरण आले होते. जिल्हा न्यायालयाचे तत्कालीन सत्र न्यायाधीश डॉ. यशवंत चावरे यांच्यासमोर सभापती छोटम आणि त्यांचे सहकारी मकरंद भोईर, विक्रांत कुडतरकर, विवेक कुडतरकर, शिशिर म्हात्रे, संतोष साळुंखे, जयवंत साळुंखे हजर झाले. या सातही जणांचा अटकपूर्व अंतिम जामीन न्यायालयाने फेटाळला होता.सेशन केस क्र. ७८/२०१३ मध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी दिलेल्या निकालानुसार दोषी ठरलेले रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती दिलीप उर्फ छोटम विठ्ठल भोईर, विक्रम वामन साळुंखे, विक्रांत विश्वनाथ कूडतरकर, मकरंद रविंद्र भोईर, विकेश वसंत ठक्कर, भरत अभिमान्य खळगे, गणेश रमेश म्हात्रे, संतोष वामन साळुंखे, सज्जाद शगीर मूल्ला, गणेश बळीराम भोईर, विवेक विश्वनाथ कूडतरकर, शिशिर शंकर म्हात्रे, हेमंत अनंत केळकर, जयवंत शामराव साळुंखे, विरेश रमेश खेडेकर, प्रभाकर रामचंद्र गवाणकर, प्रसाद दत्ता शिवदे, अशोक शांताराम थळे, मनोज जगन्नाथ थळे, राजेंद्र काशिनाथ ठाकूर व विजय राजाराम ठाकूर या २१ जणांना शिक्षा करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील चार आरोपी नितेश सुनिल गुरव, सूजित सदानंद माने, गणेश सोपान साळुंखे व उमेश शांताराम खेडेकर यांना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी दिलीप भोईर यांच्यावर हाफ मर्डर, मारहाण व गुन्हेगारी कृत्याचे कलमांखाली गुन्हे दाखल होते. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेमुळे भोईर यांचे आगामी निवडणुकांमधील उमेदवारीचे मनसुबे धुळीस मि ळाले आहेत. शिंदे गटात प्रवेश घेतल्यानंतर भोईर हे स्थानिक राजकारणात प्रभावशाली मानले जात होते. मात्र, या निकालानंतर त्यांचा राजकीय प्रवास अडचणीत आला आहे.

या निकालामुळे चोंढी परिसरात चर्चेला उधाण आले असून, शिंदे गटासाठी हा मोठा धक्का असल्याचे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे. या शिक्षेच्या पार्श्वभूमीवर भोईर समर्थक आता पुढील कायदेशीर पर्यायांचा विचार करीत आहेत, अशी माहिती मिळाली आहे.एकंदरीत, चोंढीतील १२ वर्षांपूर्वीचा वाद अखेर न्यायालयीन टप्प्यात निर्णायक ठरला असून, या निर्णयाने स्थानिक राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शिवसेनेच्या 'आपला दवाखाना'साठी चार वर्षांत २९ कोटी घेतले..

**ठाणे :** राज्यात महायुतीच्या माध्यमातून शिवसेना-भाजप सत्तेत असले तरी ठाण्यात मात्र या दोन्ही पक्षांमधील राजकीय कुरघोड्यांना वेग आला आहे. एकीकडे नवी मुंबईतून गणेश नाईक यांनी ठाण्यातील शिवसेनेला आव्हान उभे केले आहे, तर दुसरीकडे ठाणे शहरातील भाजप आमदार संजय केळकर आणि स्थानिक भाजप माजी नगरसेवकांकडूनही आता महापालिकेतील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत शिवसेनेला आव्हान देण्याचा प्रयत्न सुरू आहे. ठाणे महापालिकेच्या योजनांमधील अनियमिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून शिवसेनेवर आरोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडूनही आता भाजपच्या या आरोपांना प्रत्युत्तर देण्यास सुरुवात झाली आहे.ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी जनसंवाद अभियानाच्या माध्यमातून शिवसेनेच्या ठाण्यातील महत्त्वाकांक्षी 'आपला दवाखाना' योजनेतील अनियमितता चव्हाट्यावर आणून प्रशासनाला जाब विचारलेला आहे. चार वर्षांमध्ये २९ कोटी रुपयांहून अधिक रक्कम घेऊनही नागरिकांना सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने केळकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

## मी सुद्धा लोकलने येणार, राज ठाकरे यांची घोषणा

**मुंबई :** 'ईव्हीएममधून होणाऱ्या घोटाळ्याच्या विरोधात १ तारखेचा मोर्चा काढत आहोत. दणदणीत मोर्चा झाला पाहिजे. दिल्लीत कळलं पाहिजे की महाराष्ट्र ात काय आग पेटतेय ती. शिवाजी पार्क सारखी तिकडची परिस्थिती नाही. त्यामुळे तिकडे बसेस किती जातात ते माहिती नाही. पण माझी महाराष्ट्र सैनिकांना, म तदारांना, सर्वांना आवाहन करतोय, या मोर्चात सहभागी व्हा. महाराष्ट्रात काय प्रकारचा राग आहे ते तुम्ही या मोर्चातून दाखवा. तो व्यक्त करण्यासाठी तुम्हाला तिकडे यावं लागेल. आज नोकरी होती. बॉसने नाही सांगितलं. बॉसला मारा. शनिवारपुरता एक मत त्याच्या गालावर द्या. मला असं वाटतं तुमचा बॉस म



तदारच आहे. त्यालाही मोर्चात घेऊन या', अशा मिश्किल शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मोर्चात सहभागी होण्याचं आवाहन केलं.

मतदार उन्हातान्हात रांगेत उभा राहतो. त्याच्या मताचा तो अपमान आहे. हे सर्व सुधारलं पाहिजे. हे सगळं नीट झालं पाहिजे. देशातील निवडणुका पारदर्शकपणे झाल्या पाहिजेत. या मशीन तर जगात कुठेच नाहीत. सर्व पुढारलेल्या देशात आजही बॅलेट पेपरवर मतदान होतात. तीन-चार देशात वोटींग मशीन वापरलं जातं. तेही कुठे तर आफ्रिकेत. पण सगळ्या देशांत बॅलेट पेपर वापरला जातो. हे मी नाही बोललो. पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलले आहेत. त्यांचाही एक व्हिडीओ माझ्याकडे आहे', असं राज ठाकरे म्हणाले.मुंबईचा मोर्चा झाल्यानंतर घराघरात जा. तुम्हाला चेहरे कळले पाहिजेत. महापालिकेच्या आयुक्तांच्या बंगल्यावर? एकाचा पत्ता सुलभ शौचालयाचा? बसला असताना सही घेतली काय?', असे मिश्किल सवाल राज ठाकरेंनी केले.

# 'ऑपरेशन लोटस'ची तयारी पूर्ण, नगरमध्ये काय घडतंय?

## शरद पवारांना आणखी एका बालेकिल्ल्यात हादरे देण्याचा भाजपचा प्लॅन..

**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा बालेकिल्ला अशी एकेकाळी ओळख असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे अलीकडे बदलत आहेत. काँग्रेस आणि नंतर राष्ट्रवादीच्या माध्यम ातून पवारांची पकड होती. पुण्यानंतर नगरमध्ये पवारांचे अधिक लक्ष असते. अशा नगर जिल्ह्यात भाजपला गेल्या काही काळात खासदार, आमदार, सभापती, महापौर, नगराध्यक्ष, जिल्हा बँकेचे अध्यक्षपद, सरपंच अशी बहुतांश पदे मिळाली. मात्र, जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भाजपला अद्याप मिळविता आलेले नाही. आता त्यावर लक्ष केंद्रित करीत भाजपने 'ऑपरेशन लोटस' नावाने राजकीय मोहीम सुरू केली आहे. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक भांगरे यांच्या पत्नी सुनीता भांगरे यांचा नुकताच भाजपमध्ये प्रवेश घडवून आणला आहे. आरक्षित जागेवर आता त्याच जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या प्रबळ दावेदार असल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते, पवार यांचे पारंपरिक राजकीय विरोधक राधाकृष्ण विखे यांनी दिवाळीनंतर जिल्ह्यात ऑपरेशन लोटस राबवणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आता पक्षांतराला वेग आला आहे. सत्ताधारी पक्षांकडे अधिक ओढा आहे, त्यातही पवार यांच्या पक्षातून येणाऱ्यांची संख्या म ोठी आहे. काही दिवसांपूर्वी पवार यांच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यांनी अद्याप पुढील भूमिका स्पष्ट केलेली नाही. मात्र, दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या



निवडणुका डोळ्यासमोर ठेवत अनेकांनी पक्षांतरे सुरू केली आहेत.भाजपने अहिल्यानगर जिल्ह्यात मधल्या काळात सर्व प्रकारच्या सत्ता मिळविण्यात यश मिळविले. मात्र, जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद पक्षाला अतापर्यंत मिळालेले नाही. आता पक्षफुटीनंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीत ते मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. यावेळी हे पद अनुसूचित जमाती महिला या प्रवर्गासाठी राखीव आहे. या प्रवर्गातील आणि पवार यांच्या पक्षाशी संबंधित असलेल्या भांगरे यांचा आता भाजपमध्ये प्रवेश घडवून आणण्यात आला आहे. यात विखे यांची महत्वाची भूमिका राहिली. त्यानंतरही पक्षात आवक सुरूच आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीत नगरची जागा खासदार नीलेश लंके यांच्या रुपाने पवारांच्या पक्षाला मिळाली. मात्र, विधानसभा निवडणुकीत केवळ आमदार रोहित पवार यांची एक जागा पक्षाला मि ळाली. बदलते राजकारण पाहून पक्षातून जाणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या वाढत आहे. त्यांना थोपविण्याचे काम खासदार लंके किंवा आमदार पवारही करू शकत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे आता स्वतः शरद पवार स्वतः डॅमेज कँट्रोलसाठी काय करतात, याकडे लक्ष लागले आहे.

# फोटो, व्हिडिओ अनब स्क्रीनशॉट सापडले, प्रशांत बनकरचा लॅपटॉप जप्त





**सातारा :** फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात आता वेगवेगळी माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रशांत बनकर आणि पीएसआय गोपाल बदने यांना पुन्हा दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस त्यांची कसून चौकशी करत आहे. पण आता आरोपी पीएसआय गोपाल बदनेचा पाय आणखी खोलात गेला असल्याचं समोर आलं आहे. पीएसआय गोपाल बदनेने लपवलेला मोबाईल पोलिसांनी जप्त केला आहे. तर दुसरा संशयित आरोपी प्रशांत बनकरचा लॅपटॉप पोलिसांनी जप्त केला आहे. त्यातून पोलिसांना काही फोटो, व्हिडिओ आणि स्क्रीनशॉट मिळाले आहेत.महिला डॉक्टरने आत्महत्या करण्यापूर्वी गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या दोघांवर मानसिक व शारीरिक छळाचा आरोप केला होता. याबाबत त्यांनी हातावर नोट लिहिली होती. डॉक्टरच्या आत्महत्येनंतर पोलिसांनी तातडीने प्रशांत बनकरच्या घरी जाऊन त्याला अटक केली. त्यानंतर त्याचा लॅपटॉप पोलिसांनी जप्त केला आहे. त्यातून पोलिसांना मोठे पुरावे हाती लागले आहेत. गोपाल बदने हा दोन दिवस फरार होता. पहिले तो पंढरपूर येथे गेला, त्यानंतर सोलापूर आणि मग कुटुंबीयांना भेटण्यासाठी बीडला गेला. त्यानंतर तो फलटण पोलीस ठाण्यात येऊन सरेंडर झाला. मात्र, सरेंडर होताना गोपाल बदनेने फोन जमा केला नाही. त्याने चालाखीने तो फोन कुठेतरी लपवला होता. तर चौकशीत गोपाल बदने सहकार्य करत नसल्याचं पोलिसांनी कोर्टात सांगितलं आहे. या धक्कादायक घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने २३ ऑक्टोबर रात्री एका हॉटेलच्या खोलीत गळफास घेऊन जीवन संपवलं. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या हातावर काही मजकूर लिहून ठेवला होता, ज्यामध्ये निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याच्यावर चारवेळा लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप केला होता.या प्रकरणामुळे वैद्यकीय आणि पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून पीडित महिला डॉक्टर आणि फलटण पोलिसांमध्ये तणावाचं वातावरण होतं. या पार्श्वभूमीवर दोघांकडूनच प्रशासकीय स्तरावर तक्रारी करण्यात आल्या होत्या. दरम्यान, आरोपी पोलिस अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी फलटण पोलीस ठाण्याचे तत्कालीन निरीक्षक महाडिक यांनी जिल्हा आरोग्य विभागाशी संपर्क साधला होता. या चौकशीत महिला डॉक्टरने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध अनेक गंभीर आरोप नोंदवले होते.

## भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक, पती-पत्नीसह एकाचा जागीच अंत

**वाशिम :** वाशिम जिल्ह्यातून जाणाऱ्या नागपूर – संभाजीनगर महामार्गावरील जऊळका गावातील चैत्रबन ढाब्याजवळ आज गुरुवारी रोजी दुपारच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जबर धडक झाली. या भीषण अपघातात पती पत्नी आणि एका युवकाचा अशा तिघांचा जागीच मृत्यू झाला असून दोनजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किसन नंदू भोकरे (वय २०, रा. सावरखेड ता. पातूर, जि. अकोला), सदाशिव राठोड आणि सरलाबाई सदाशिव राठोड (दोघे रा. मंगरूळपीर, ता. जि. वाशिम) या पती पत्नीचा जागीच मृत्यू झाला. तर किसन भोकरे यांच्या दुचाकीवरील साथीदार राजू लठाड (वय २७, रा. कोळदरा) हे गंभीर जखमी झाले आहेत. मृतक किसन भोकरे व त्याचा सहकारी दुचाकी क्रमांक एम.एच ३० बीजे ५४४५ गाडी घेऊन अकोला जिल्ह्यातील सावरखेड येथून शेलूबाजारकडे जात होते. समोरून येणाऱ्या दुचाकी क्रमांक एमएच ३७ एएल ५४७९ यावर सदाशिव राठोड व त्यांच्या पत्नी सरलाबाई राठोड मंगरूळपीरवरुन मुंबईकडे जात असताना जऊळका येथील चैत्रबन ढाब्याजवळ या दोन्ही दुचाकींची समोरासमोर जबर धडक झाली, आणि भीषण अपघात झाला. या अपघातानंतर अपघातग्रस्त वाहनधारक रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडले होते.रस्त्याने जाणाऱ्या काही प्रवाशांनी अपघाताची माहिती जऊळका पोलिसांना कळविताच जऊळका पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्तांना रुग्णवाहिकेतून दवाखान्यात दाखल केलं. यावेळी डॉक्टरांनी तपासणी केली असता तिघांना मृत घोषित केले तर एकावर गंभीर जखमीवर तात्काळ उपचार सुरू केले आहेत. या अपघातात पती पत्नीचा आणि एका २० वर्षाच्या तरुणाचा मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे.

## विवाहबाह्य संबंधातून मुलाचा जीव घेण्याचा कट

**अमरावती :** अमरावती शहरात एका आईने आपल्या पोटच्या लेकाची हत्या करण्याचा अमानुष कट रचल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या निर्दयी आईसह तिच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे.



अमरावती शहरातील धामणगाव रेल्वे परिसरात ही घटना घडली. मृत मुलाचे नाव गणेश उर्फ शुभम गजानन वारंगणे असून, त्याची आई दुर्गा वारंगणे आहे. दुर्गा यांचे मनोज किर्तने या पुरुषासोबत विवाहबाह्य संबंध होती. पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, दुर्गाला असे वाटत होते की तिचा मुलगा गणेश त्यांच्या प्रेमसंबंधात अडथळा निर्माण करत आहे. या कारणामुळे ७ ऑक्टोबरला दुर्गा आणि तिच्या प्रियकराने दोन इतर साथीदारांसोबत मिळून गणेशवर हल्ला करण्याचा कट रचला.त्या दिवशी सकाळी गणेशला मोटारसायकलवर बसवून आसेगाव परिसरातील शेतात नेलं गेले, जिथे त्याच्यावर बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीमुळे गणेशचा मृत्यू झाला. तरुणाच्या मामानी या घटनेविरुद्ध दत्तापूर पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला.माहितीनुसार, ८ ऑक्टोबर रोजी दत्तापूर पोलिस ठाण्यात डॉ. आकाश येंडे यांनी सांगितले की, गणेश मृतावस्थेत रुग्णालयात दाखल झाला होता. तपास सुरू केल्यावर पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. फक्त चार तासांतच पोलिसांनी दुर्गा, तिचा प्रियकर मनोज, तसेच इतर दोन साथीदार अमोल अर्जुने आणि अशोक चवरे यांचा छडा लावून त्यांना अटक केली. आरोपींना अटक करताच चौकशी केली गेली आणि त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. तपासात स्पष्ट झाले की दुर्गा नेच हा कट रचला आणि आपल्या पोटच्या मुलाचा जीव घेतला. या निर्दयी घटनेमुळे अमरावती शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# बारामतीत ओळख, पुण्यात शारीरिक संबंध; MPSC करणाऱ्या तरुणीचे गंभीर आरोप, नामांकित उद्योगपतीवर गुन्हा दाखल



**बारामती :** बारामती येथील नामांकित उद्योगपतीचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे.'रियल डेअरी' कंपनीचे मालक मनोज कुंडलिक तुपे यांच्यावर पुण्यात राहून एमपीएससी परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या एका तरुणीवर वारंवार बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, पीडिता आणि आरोपी मनोज तुपे यांची ओळख २०२१ साली बारामतीत झाली, जिथे आरोपीने मोठ्या व्यवसायाची ओळख सांगत विश्वास संपादन केला. तुपे याने नंतर पीडित तरुणीला व तिच्या मैत्रिणीला नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. मे २०२१ पासून पीडिता पुण्यात स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी स्थायिक झाली. त्यानंतर तिचे आरोपीशी सतत फोनवर बोलणे सुरू राहिले. पीडितेच्या म्हणण्यानुसार, ऑगस्ट २०२१ मध्ये आरोपीने गाडीत जबरदस्ती केली आणि नंतरही वेगवेगळ्या हॉटेलमध्ये नेऊन लग्नाचे आमिष देत वारंवार शारीरिक संबंध ठेवले.दरम्यान, पीडितेचे २०२२ मध्ये लग्न झाले होते. मात्र २०२३ पासून ती नवऱ्यापासून विभक्त झाली. या काळातही आरोपीने तिला लग्नाचे आश्वासन देत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. २०२५ मध्ये लग्नावरून या दोघांमध्ये वाद निर्माण झाला. आरोपीने समाजातील प्रतिष्ठेचा हवाला देत लग्नाला नकार दिला, दरम्यान प्रेग्नन्सी टाळण्यासाठी त्याने जबरदस्तीने गोळ्या दिल्याचा आरोपही पीडित महिलेने केला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून पुण्यातील हडपसर पोलीस स्टेशनमध्ये मनोज तुपे याच्यावर बलात्कार, धमकी, फसवणूक अशा विविध कलमांखाली (खझउ ३७६, ५०६ इ.) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, ही घटना २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घडली असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत. प्रसिद्ध उद्योगपतीवर बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्याने बारामती परिसरात आणि उद्योगजगतात मोठी खळबळ उडाली आहे. आरोपी उद्योगपती असल्याने, या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले.

# भारताच्या वाघिणींची फायनलमध्ये एन्ट्री

## ऑस्ट्रेलियाकडून सामना हिसकावला ; जेमिमाह ठरली मॅचविनर

**नवी मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात महिला विश्वचषक स्पर्धेतील सेमी फायनलचा सामना रंगला. या सामन्याचे नाणेफेक ऑस्ट्रेलियाने जिंकले आणि सामना मात्र भारताने ५ विकेट्सने जिंकला. आता भारतीय संघाने थाटामाटात फायनलमध्ये एन्ट्री घेतली आहे. आता फायनलचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मध्ये रंगेल. आता रविवारी फायनलच्या सामन्याचा थरार रंगेल.

भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२५च्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. डीवाय पाटील स्पोर्ट्स अकादमीच्या मैदानावर भारताने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, जेमिमाह रॉड्रिग्जच्या शतकामुळे भारताला ४९ षटकांत लक्ष्य गाठता आले. टीम इंडियाने हा सामना ५ विकेट्सने जिंकला. विश्वचषक इतिहासातील नॉकआउट सामन्यात हा सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. आतापर्यंत पुरुषांच्या विश्वचषकातही असे घडले नव्हते. २ नोव्हेंबर रोजी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल.



भारतासाठी जेमिमाह रॉड्रिग्जने शतक झळकावले. ती शेवटपर्यंत नाबाद राहिली आणि संघाला अंतिम फेरीत नेले. तिने १३४ चेंडूंचा सामना करत १४ चौकार मारत १२७ धावांची खेळी केली. जेमिमाहने हरमनप्रीत कौरसोबत तिसऱ्या विकेटसाठी १६७ धावांची भागीदारी केली. १५६ चेंडूंच्या या भागीदारीने सामना भारताच्या बाजूने वळवला. हरमनप्रीत कौरने शतक हुकले, तिने ८८ चेंडूत ८९ धावा केल्या. दीप्ती शर्माने १७ चेंडूत २४ धावा केल्या, तर रिचा घोषने १६ चेंडूत २६ धावा केल्या. शेवटी, अमनजोत कौर ८ चेंडूत १५ धावा करून नाबाद राहिली.

ऑस्ट्रेलियाकडून सलामीवीर फोबी लिचफिल्डने ११९ धावा केल्या. एलिस पेरी (७७ धावा) आणि ॲशले गार्डनर (६३ धावा) यांनीही अर्धशतके झळकावली. डावखुरा फिरकीपटू श्री चरणीने ४९ धावांत दोन बळी घेतले. पाहुण्या संघाने २२० धावांवरून सहा बळींत २६५ धावा केल्या, परंतु गार्डनरच्या ४५ चेंडूंच्या खेळीमुळे संघ ३०० धावांच्या पुढे गेला. संघ एक चेंडू शिल्लक असताना ३३८ धावांतच गारद झाला. लिचफिल्डने तिच्या ९३ चेंडूंच्या खेळीत १७ चौकार आणि तीन षटकार मारले. पेरीने तिच्या ८८ चेंडूंच्या खेळीत सहा चौकार आणि दोन षटकार मारले. लिचफिल्ड आणि पेरीने १३३ चेंडूंमध्ये दुसऱ्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. डावाच्या सुरुवातीला, भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने तिसऱ्या षटकात तिचा झेल सोडत एलिसा हिलीला दिलासा दिला. प्लेइंग इलेव्हनमध्ये परतलेली ऑस्ट्रेलियन कर्णधार सहाव्या षटकात स्वस्तात बाद झाली. लिचफिल्डची शानदार खेळी अमनजोत कौरच्या चेंडूने आदळली, जी तिने डीप फाइन लेगवर खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु ती तिच्या मधल्या स्टंपला उखडून टाकली. पेरीने तिला चांगली साथ दिली आणि अर्धशतकासह संघात महत्त्वपूर्ण योगदान दिले. तिला राधा यादवने बाद केले. भारतीय गोलंदाजांना शिस्तबद्ध राहण्याची आवश्यकता होती, परंतु क्रांती गौड लाईन आणि लेंथमध्ये तितकी चांगली राहिली नाही आणि रेणुका सिंग इनस्विंग साध्य करण्यात अपयशी ठरली. भारताची सर्वाधिक विकेट घेणारी गोलंदाज दीप्ती (२/७३) शेवटच्या क्षणी दोन विकेट घेतल्या.



# युवराज सिंगला मिळणार हेड कोचची जबाबदारी


**दिल्ली :** आयपीएल २०२६ च्या हंगामाची चर्चा जोर धरत आहे. नवीन हंगामासाठी काही आठवड्यांत एक मिनी-लिलाव होणार आहे, ज्यामध्ये अनेक खेळाडू संघ बदलणार आहेत. काही फ्रँचायझी त्यांच्या कोचिंग आणि सपोर्ट स्टाफमध्येही बदल करत आहेत आणि अशाच एका संघात टीम इंडियाचा माजी स्टार अष्टपैलू धीीरिक्ष डळपसह चा समावेश असू शकतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून आयपीएलपर्यंत फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात आपली कला दाखवणारा युवराज आयपीएलमध्ये आता प्रशिक्षकाची जबाबदारी पार पाडताना दिसणार आहे.

एका अहवालात दावा करण्यात आला आहे की Lucknow Super Giants फ्रँचायझी सध्या युवराज सिंगसोबत कोचिंगबाबत चर्चा करत आहे. या चर्चा अद्याप प्राथमिक टप्प्यात असताना, असा दावा केला जात आहे की फ्रँचायझी त्यांचे सध्याचे प्रशिक्षक जस्टिन लँगर यांना बदलू इच्छित आहे कारण त्यांनी स्थानिक खेळाडूंशी आवश्यक संबंध विकसित केलेले नाहीत. अहवालात असे म्हटले आहे की सलग दोन परदेशी प्रशिक्षकांनंतर, फ्रँचायझी आता ही जबाबदारी एका भारतीयाला देऊ इच्छित आहे. म्हणूनच ते आता युवराज सिंगशी



चर्चा करत आहे. युवराजला कोणत्याही संघाचे प्रशिक्षण किंवा मार्गदर्शन करण्याचा अनुभव नाही. तसेच तो कोणत्याही स्तरावर सहाय्यक प्रशिक्षकही राहिलेला नाही. युवराजने वैयक्तिकरित्या प्रशिक्षण दिले आहे, विशेषतः सध्याचा भारतीय कर्णधार शुभमन गिल आणि तरुण सलामीवीर अभिषेक शर्मा, ज्यांना युवराजने गेल्या काही वर्षांत लक्षणीय मदत केली आहे. आता पंजाबच्या प्रियांश आर्यलाही वैयक्तिकरित्या प्रशिक्षण देत आहे. युवराज आणि लखनऊ संघ काम करतील की नाही हे येत्या काळात स्पष्ट होईल. यामुळे लखनौबद्दलही प्रश्न उपस्थित होतात, ज्याने फक्त चार हंगामात दोन मुख्य प्रशिक्षक बदल पाहिले आहेत. लँगरपूर्वी, अँडी फ्लॉवर पहिल्या दोन हंगामांसाठी मुख्य प्रशिक्षक होते.

# पुण्याच्या डिएनानं रचला इतिहास!



**मुंबई :** पुण्याची डिएना पुंदोलेनं रेसिंग या पुरूषांच्या समजल्या जाणाऱ्या खेळात आपला दबदबा निर्माण केला आहे. ती फक्त रेसिंगच करत नाहीये तर डिएना पुंदोलेनं इतिहास देखील रचला आहे. ती Ferrari in an international championship मध्ये रेस करणारी पहिली भारतीय महिला ठरली आहे. ती फेरारी क्लब चॅलेंज मीडल इस्टमध्ये नोव्हेंबर ते एप्रिल दरम्यान सहभागी होणार आहे. ती Ferrari 296 Challenge कार चालवणार आहे. ही स्पर्धा दुबईच्या फॉर्मुला वन सर्किट, अबु धाबी, बेहरीन, कतार आणि सौदी अरेबिया सारख्या प्रसिद्ध ट्रॅक्सवर रेसिंग करणार आहे.

३२ वर्षाची डिएनाने यानंतर प्रतिक्रिया देताना हा खरंच एक चांगला सन्मान आहे असं म्हटलं. 'मिडल ईस्ट फेरारी क्लब चॅलेंज मध्ये भाग घेणं आणि पहिली भारतीय म्हणून भाग घेणं हा अभिमानाचा क्षण आहे. हा फक्त माझ्यासाठी नाही तर भारतातील मोटरस्पोर्ट्समधील सर्व महिलांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. मला आशा आहे की यामुळं देशातील अनेक महिलांना रेसिंगकडे वळण्याची प्रेरणा मिळेल.'

# युवा क्रिकेटपटूचा मानेला चेंडू लागून मृत्यू





**सिडनी :** ऑस्ट्रेलिया क्रिकेटमध्ये ११ वर्षांपूर्वीच्या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. क्रिकेटपटू फिल फिल ह्यूजप्रमाणेच मानेला चेंडू लागल्याने १७ वर्षीय युवा क्रिकेटपटू बेन ऑस्टिन याचा मृत्यू झाला आहे. क्रिकेटप्रेमींसाठी अत्यंत वेदनादायी ठरलेल्या या घटनेवर अनेक क्रिकेटपटूंनी शोक व्यक्त केला आहे.

बेन ऑस्टिन हा मेलबर्नमधील एक युवा क्रिकेटपटू होता. सामन्याच्या सरावापूर्वी तो 'वँगर'द्वारे फेकलेल्या चेंडूमुळे जखमी झाला. विशेष म्हणजे ऑस्टिन याने हेल्मेट घातले होते, पण त्याला स्टेम गार्ड लावले नव्हते. या दुर्दैवी घटनेबाबत क्रिकेट व्हिक्टोरियाचे प्रमुख निक कमिन्स म्हणाले, '११ वर्षांपूर्वी फिल ह्यूजसोबत झालेल्या अपघाताप्रमाणे त्याच्याही मनेला चेंडू लागला होता.' बेनचे वडील जेस म्हणाले, 'या दुःखद घटनेने बेनला आमच्यापासून हिरावून घेतले आहे.'

क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे अध्यक्ष माईक बेयर्ड म्हणाले, 'काही दिवस असे असतात जेव्हा तुमचे हृदय तुटते. त्यापैकीच एक दिवस आहे.क्रिकेट हा एक असा खेळ आहे जो लोकांना आणि समुदायांना जोडतो. हा एक असा खेळ आहे जो खूप खोलवर अनुभवला जातो. स्पष्ट आहे की, यातून आम्हाला काही गोष्टी शिकायच्या आहेत, परंतु सध्या आम्ही कुटुंबाबद्दल चिंतित आहोत आणि त्यांना सर्व प्रकारे आधार देण्याचा प्रयत्न करत आहोत.' २०१४ मध्ये ऑस्ट्रेलियाचा २५ वर्षीय क्रिकेटपटू फिल ह्यूज याला शेफिल्ड शील्ड सामन्यात डोक्याला दुखापत झाली. त्याला सिडनीमधील एका हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले; पण सेरेब्रल हेमरिज म्हणजेच मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला होता.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# संत तुकारामांचा जीवनप्रवास मोठ्या पडद्यावर!

## 'अभंग तुकाराम' ७ नोव्हेंबरला होणार प्रदर्शित

**मुंबई :** महाराष्ट्राला संत-महात्म्यांची उज्ज्वल परंपरा आहे. माऊलींच्या ज्ञानेश्वरीने महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचा पाया रचला आणि जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगांनी त्याच्यावर कळस चढवला. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. संत तुकाराम महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. जीवनप्रवाहात कायम राहून त्यांनी घेतलेला परमेश्वरप्राप्तीचा ध्यास आणि यातून घडलेला त्यांचा आध्यात्मिक प्रवास चकित करणारा आहे.

पुणे : लौकिकाडून अलौकिकाकडे नेणारा संत तुकाराम यांचा हा जीवनप्रवास 'अभंग तुकाराम' या चित्रपटातून दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी मांडला आहे. पॅनोरमा स्टुडिओज, चित्रकथी क्रिएशन्स निर्मित 'अभंग तुकाराम' ७ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येणार आहे. पॅनोरमा स्टुडिओज ही निर्मिती संस्था या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. पॅनोरमा स्टुडिओचे कुमार मंगत पाठक चित्रपटाचे निर्माते आहेत. त्यासोबत अभिषेक पाठक, अजय अशोक पूरकर, दिग्पाल लांजेकर यांनीही निर्मितीची धुरा सांभाळली असून सहनिर्माते मुरलीधर छतवानी, रवींद्र औटी आहेत.

दिव्य अनुभवाची प्रचिती देणाऱ्या या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित आहे. प्रेमरूप भक्तितत्त्वातून वास्तवाचे दर्शन घडविताना लोकजीवनातील



भक्तीची गंगा अखंड वाहती ठेवून उभ्या केलेल्या जीवनवादी विवेकदर्शनाची झलक या ट्रेलरमधून दिसुन येते आहे. प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या भूमिकेत आहेत तर त्यांच्या पत्नीच्या आवलीच्या भूमिकेत अभिनेत्री स्मिता शेवाळे दिसणार आहे त्यासोबत मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, अजय पुरकर, विराजस कुलकर्णी, अभिजित श्वेतचन्द्र, अजिंक्य राऊत, निखिल राऊत, बिपीन सुर्वे, सचिन भिलारे, अवधूत गांधी, नुपूर दैठणकर,तेजस बर्वे, ईश्मिता जोशी, रुद्र कोळेकर, अभीर गोरे या कलाकारांच्या चित्रपटात भूमिका आहेत.

'अभंग तुकाराम' चित्रपटाची कथा आणि संवाद प्रसिद्ध लेखक योगेश सोमण यांचे आहे. दिग्पाल लांजेकर यांनी पटकथा आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. वारकरी संगीत हा चित्रपटाचा आत्मा आहे. अभंग गाथा हा विषय असल्याने तब्बल १० अभंगांचा समावेश या चित्रपटात करण्यात आलेला आहे. प्रसिद्ध गायक संगीतकार अवधूत गांधी यांनी या चित्रपटाच्या संगीताची धुरा सांभाळली आहे. अवधूत गांधी, बेला शेंडे, अजय पूरकर, जयदीप वैद्य, अजित विसपुते, चंद्रकांत माने, नूतन परब, अमिता घुगरी, मुक्ता जोशी, ईश्वरी बाविस्कर, ज्ञानेश्वर मेश्राम, केदार जोशी या गायकांचा स्वरसाज चित्रपटातील गाण्यांना लाभला आहे.

चित्रपटाचे छायांकन संदीप शिंदे यांचे आहे. संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे. रंगभूषा अतुल मस्के तर वेशभूषा सौरभ कांबळे यांची आहे. संगीत संयोजन आणि पार्श्वसंगीताची जबाबदारी मयूर राऊत यांनी सांभाळली आहे. ध्वनी आरेखन निखिल लांजेकर, हिमांशू आंबेकर यांचे आहे. साहसदृश्ये बब्बू खन्ना यांची आहेत. नृत्यदिग्दर्शन सुमित साळुंखे तर कलादिग्दर्शन प्रतीक रेडीज, संजय करोले यांचे आहे. निर्मिती पश्चात प्रक्रिया सचिन भिल्लारे यांची आहे. व्हीएफएक्स ची जबाबदारी शॉक अँड ऑ फिल्म्स यांनी तर व्हिजुअल प्रमोशनची जबाबदारी कॅटलिस्ट क्रिएटस यांनी सांभाळली आहे. सिनेमन एंटरटेनमेंटचे जय गोटेचा मार्केटिंग डायरेक्टर आहेत. कार्यकारी निर्मात्या केतकी गद्रे अभ्यंकर आहेत. पॅनोरमा स्टुडिओज जगभरात (वर्ल्ड वाईड) या चित्रपटाचे वितरण करणार आहे.

# अभिनेते सुधीर दळवी यांची प्रकृती नाजूक



**मुंबई :** हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सुधीर दळवी यांची प्रकृती सध्या नाजूक असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. 'शिर्डी के साई बाबा' या चित्रपटातील साईबाबांच्या भूमिकेमुळे ते संपूर्ण देशभर ओळखले गेले. ते ८६ वर्षांचे असून त्यांना ८ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मीडिया रिपोर्टनुसार, वैद्यकीय उपचारांचा खर्च खूप मोठा असल्याने, त्यांच्या कुटुंबीयांनी आता लोकांना आर्थिक मदतीसाठी आवाहन केलं आहे. मागील काही काळापासून सुधीर दळवी हे सेप्टिक इन्फेक्शन झाल्याने गंभीर आजारपणाशी झुंज देत आहेत.

त्यांच्या उपचारांसाठी १५ लाख रुपये इतक्या मोठ्या रकमेची आवश्यकता आहे. सुधीर दळवी यांच्या कुटुंबीयांनी आणि जवळच्या मित्रपरिवाराने चाहत्यांकडे आणि चित्रपटसृष्टीतील सहकाऱ्यांकडे आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. वृद्धापकाळामुळे आणि वाढत्या वैद्यकीय खर्चामुळे उपचारांचा खर्च पेलणे कठीण होत आहे. त्यामुळे सोशल मीडियावर त्यांच्या मदतीसाठी मोहिम सुरू करण्यात आली आहे. सुधीर दळवी यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत अनेक हिंदी, मराठी तसेच टेलिव्हिजन मालिकांमध्ये काम केले आहे. 'शिर्डी के साई बाबा' या चित्रपटात त्यांनी साकारलेला साईबाबांचा साधा, शांत आणि आध्यात्मिक चेहरा आजही प्रेक्षकांच्या मनात कोरला गेला आहे. त्याशिवाय 'हम लोग', 'कबीर', 'रामायण', 'स्वामी' यांसारख्या लोकप्रिय मालिकांमध्येही त्यांनी उल्लेखनीय भूमिका साकारल्या आहेत. 'जय संतोषी माँ' आणि 'रामायण'सारख्या टीव्ही मालिकांमध्ये तर सुधीर यांनी 'विधिलिखित', 'ऐकावं ते नवल', 'देवता', 'घर संसार' या मराठी चित्रपटांत काम केलंय.

# दाऊदने मुंबईमध्ये ब्लास्ट केलाच नव्हता

**मुंबई :** ९०च्या दशकातील अभिनेत्री ममता कुलकर्णी आता अध्यात्माच्या वाटेवर चालत असून पुन्हा एकदा चर्चेत आहे. तिच्या विधानाने पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. पण तिच्या विधानाने देशभरात खळबळ उडाली. उत्तर प्रदेशात असताना तिने दाऊद ईब्राहीमबाबत असे काही स्टेटमेंट केले की प्रत्येकाच्या भुवया आश्चर्याने उंचावल्या. तिने बोलत बोलत दाऊद इब्राहीमला क्लीन चिट दिली. हे विधान सोशल मिडियावर व्हायरल होताच नव्या वादाला तोंड फुटले आहे.

ममता म्हणते, ' दाऊद इब्राहीम आतंकवादी नव्हता. त्याने बॉम्ब ब्लास्ट केले नाहीत. तो आतंकवादी नाही. मुंबईत बॉम्बस्फोट कधी केले नाहीत.' या विधानाच्या शेवटी तिने हे देखील सांगितले की ती दाऊदला प्रत्यक्षात कधीच भेटली नाही. पुढे ती म्हणते की,



आता ती पूर्णपणे अध्यात्माच्या रस्त्यावर आहे. राजकारण आणि सिनेमाशी तिचा काहीच संबंध नाही. १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोटाचा मास्टरमाइंड म्हणून दाऊद ईबराहीमचे नाव समोर आले आहे. याशिवाय तो अजूनही भारताच्या मोस्ट वॉन्टेड आतंकवाद्यांच्या यादीत आहे. ममताचे हे विधान ऐकून सोशल मिडियावर मात्र नाराजी आणि राग व्यक्त केला आहे. १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोटात २५७ लोकांचा मृत्यू झाला होता. सीबीआय आणि एनआयएच्या रिपोर्टनुसार दाऊद मास्टरमाइंड होता. सध्या तो फरार आहे. ममताच्या विधानाने भारतीय न्यायपालिका, सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तहेर यंत्रणा यांच्या तपासाला आव्हान दिल्याचे बोलले जात आहे.

९० च्या दशकात 'करण अर्जुन', 'कृष्णा', 'बाजी' आणि 'क्रांतिवीर' अशा सुपरहिट सिनेमात दिसलेली ममता त्यानंतर गायब झाली. त्यानंतर ती थेट २०१६ मध्ये केनया येथील ड्रग तस्करी संदर्भात तिचे नाव समोर आले होते. त्यावेळी प्रत्यार्पणानंतर तिला अटकही केली गेली होती. २०२५ च्या कुंभ मेळ्याच्या आधी तिने १२ वर्षे तपश्चर्या केली. त्यानंतर कुंभमेळ्यात संन्यास घेऊन 'माई ममता नंद गिरी' या नावाने ओळखली जाते.

# आमिर खानला 'आर. के. लक्ष्मण पुरस्कार फॉर एक्सलन्स' जाहीर

**मुंबई :** सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापन करण्यात आलेला 'आर. के. लक्ष्मण पुरस्कार फॉर एक्सलन्स' यावर्षी प्रथमच प्रदान केला जाणार आहे. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी एमसीए स्टेडियम, गहुंजे (पुणे) येथे दुपारी ३ वाजता हा भव्य सोहळा पार पडणार आहे. या पुरस्काराचा पहिला मान अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता आमिर खान याला त्याच्या भारतीय चित्रपटसृष्टीतील विलक्षण योगदानाबद्दल दिला जाणार आहे, अशी माहिती उषा लक्ष्मण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विशेष कार्यक्रमात ए. आर. रहमान, हरीहरन, सुखविंदर सिंग आणि चिन्मयी यांची थेट



सादरीकरणे होणार आहेत. रहमान यांच्या संगीतावर हजारो प्रेक्षक झिंगणार असून, हा पुण्यातील पहिलाच असा स्टेडियम कॉन्सर्ट ठरणार आहे.

उषा लक्ष्मण यांनी सांगितले की, हा पुरस्कार सोहळा केवळ संगीतप्रेमींसाठीच नव्हे, तर कला आणि सर्जनशीलतेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी खास अनुभव ठरणार आहे. आर. के. लक्ष्मण यांच्या चिकाटी, सर्जनशीलता आणि उद्देशपूर्णता या मूल्यांना जपणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराद्वारे सन्मानित करण्याचा हेतू आहे. हा अनोखा कार्यक्रम आर. के. लक्ष्मण यांच्या कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून, यात कला, संस्कृती आणि संगीत यांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पायाभूत सुविधा अनुदान योजनेंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांना अनुदान...

जनसंचलन/बुलडाणा

अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी पायाभूत सुविधा अनुदान योजनाफ्र राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत वार्षिक कमाल १० लाखापर्यंत अनुदान देण्यात येणार असून अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांनी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार यांनी केले आहे. शासन निर्णय क्रमांक अर्वाधिय-२०१५/प्र.क्र.८०/१५/का-६ दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ तसेच ७ ऑक्टोबर २०२४ नुसार पायाभुत सुविधासाठी अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना शासनमान्य खाजगी अनुदानीत, विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच नगरपरिषद क्षेत्रातील शाळांसाठी लागू आहे. संबंधित संस्थांमध्ये किमान ७० टक्के अल्पसंख्याक विद्यार्थी (अपंग शाळांसाठी ५० टक्के) शिकत असल्यास अर्ज पात्र मानला जाईल. शाळा इमारतींचे नूतनीकरण व डागडुजी, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रंथालय व प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण, संगणक कक्ष उभारणी, प्रसाधनगृह उभारणी, शैक्षणिक फर्निचर खरेदी, वर्गखोल्यांमध्ये पंखे बसविणे, इन्व्हर्टर प्रणाली बसविणे, एलसीडी प्रोजेक्टर व शैक्षणिक सॉफ्टवेअर, इंग्रजी लँग्वेज लॅब, तसेच संगणक हार्डवेअर-सॉफ्टवेअर खरेदी अशा सुविधा निर्माण किंवा अद्ययावत करण्यासाठी संस्थाना अनुदान दिले जाईल.

अल्पसंख्याक बहुल शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आयटीआय संस्था आणि अपंग शाळांनी शासन निर्णयातील नमूद कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज/प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत. विलंबाने आलेले किंवा अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा नमुना आणि आवश्यक कागदपत्रांची संपूर्ण यादी या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संबंधित संस्था प्रमुखांनी दिलेल्या मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हा रुग्णालयातील ५ नोव्हेंबरचे दिव्यांग तपासणी शिबिर रद्द...




जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा रुग्णालयात नियमितपणे प्रत्येक बुधवारी अस्थिव्यंग संबंधित दिव्यांग तपासणी बोर्ड कार्यरत असतो. मात्र येत्या बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी गुरुनानक जयंतीनिमित्त सार्वजनिक सुटी असल्यामुळे त्या दिवशी होणारे अस्थिव्यंग संबंधित दिव्यांग तपासणी शिबिर रद्द करण्यात आले आहे. सदर दिवशी नागरिकांनी जिल्हा रुग्णालय, बुलडाणा येथे दिव्यांग तपासणीस येऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच नागरिक जर त्या दिवशी तपासणीस आले, तर झालेल्या गैरसोयीस प्रशासन जबाबदार राहणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतमालाचे तात्काळ पंचनामे करा



जनसंचलन/ बुलढाणा

परतीच्या पावसामुळे जिल्ह्यात शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या नुकसानीचे पंचनामे त्वरित करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला केंद्रीय आयुष आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी दिले आहेत गेल्या आठवड्याभरामध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये परतीचा पाऊस पडत असल्यामुळे या पावसामुळे तूर हरभरा या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे . या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश केंद्रीयमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांनी आज सकाळी प्रशासनाशी संपर्क साधून त्यांना त्वरित पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत शेतकऱ्यांनी सुद्धा आपल्या गावच्या कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून झालेल्या नुकसानीची माहिती द्यावी असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यातआलेआहे.

# डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्ये प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा!...

## बुलढाणा मेडिकल असोसिएशनने काढला मोर्चा!...

जनसंचलन/बुलढाणा

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला राजपत्रित वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्ये प्रकरणी दोषींवर व प्रशासकीय दुर्लक्ष करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई व न्याय मिळवा,या मागणीसाठी बुलढाणा मेडिकल असोसिएशनने जिल्हाधिकारी कार्यालयावर आज मोर्चा काढला. न्याय न मिळाल्यास निवेदनातून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यांतील उपजिल्हा रुग्णालय, फलटण येथे कार्यरत असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी दिवंगत डॉ. संपदा मुंडे यांची दैनंदिन कामकाजाच्या प्रचंड तणावामुळे संशयास्पद मृत्यूची ही घटना अत्यंत दुर्दैवी व संतापजनक आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट-अ () संघटनेच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या प्रकरणाचे सर्वात गंभीर आणि दुर्लक्षित पैलू म्हणजे प्रशासकीय यंत्रणेची निष्क्रियता आहे. पीडितेने या त्रासाबाबत, विशेषतः १९ जुन २०२५ मध्ये,



वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यामुळे संबंधित सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तातडीने कायदेशीर व शिस्तभंगाची कारवाई करावी,डॉ.मुंडे यांच्या हातावरील सुसाईड नोटमध्ये आणि त्यांच्या तक्रार अर्जामध्ये आरोपींचा स्पष्ट उल्लेख असून, त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या व्यक्तींवर तातडीने ३०६ (आत्महत्येस प्रवृत्त करणे), ३७६ (बलात्कार) तसेच कायदा आणि अंतर्गत कठोर कारवाई होणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या प्रकरणाचा एसआयटी तर्फे तपास करण्यात यावा,प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात दाखल करून जलद न्याय प्रक्रियेसाठी सरकारी विशेष वकील नियुक्त करावा, पिडीत कुटुंबातील एकाला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे व मदत देण्यात यावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. अन्यथा आंदोलनात्मक पवित्रा! मागण्या मान्य झाल्या नाही तर २७ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान राज्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी काळी फीत लावून कामकाज करतील. २७ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन संघटना सोयीनुसार कॅण्डल मोर्चाचे आयोजन करतील. दुसऱ्या टप्प्यात १ ते ६ नोव्हेंबर दरम्यान प्रशासकीय कामकाजावर बहिष्कार राहील. तसेच ७ ते १३ नोव्हेंबर दरम्यानराज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेमध्ये सेवा पूर्ण बंद राहील, आपत्कालीन सेवा मात्र सुरूराहणारआहे.



# मोताळा तालुक्यातून क्रांतिकारी शेतकऱ्यांचा बच्चू कडू व रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या आंदोलनाला उत्स्फूर्त पाठिंबा!

**जनसंचलन/बुलडाणा**

नागपूर येथे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू व रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या ङ्गमहाएल्गार आंदोलनालाफ आज मोताळा तालुक्यातील क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे शेकडो शेतकरी एकत्र येत जोरदार पाठिंबा दर्शविला. या वेळी क्रांतिकारी संघटनेचे नेते उमेशसिंग राजपूत, बडू देशमुख, वसिम सैयद, महेंद्र जाधव, भागवत धोरन, नानाभाऊ जाटोळ, श्रीकांत पिसे यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते व असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, दिव्यांगांचे प्रश्न, मच्छीमार, मेंढपाळ यांचे प्रश्न, शेती उत्पादनाला हमीभाव यांसारख्या मूलभूत मागण्यांसाठी सुरू असलेल्या




या आंदोलनाला मोताळा तालुक्यातून मिळालेला पाठिंबा शेतकरी ऐक्याची ताकद दाखवणारा ठरला आहे.

संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत तालुक्यातील शेतकऱ्यांनी एकमुखाने आवाज उठवला असून, शेतकऱ्यांचा लढा सरकारला जागं करणारच!फ्फ अशा घोषणा देत आंदोलनाला बळकटी दिली. मोताळा तालुक्यातील हा पाठिंबा आंदोलनाच्या यशाकडे एक मोठं पाऊल मानलं जात असून, येत्या काळात आणखी शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

# झटपट पैसे मिळवण्याचा नाद बेक्कार!

## जुने बस स्थानक परिसरातून ३ किलो ४०० ग्रॅम गांजा जप्त!

**जनसंचलन/बुलढाणा**

संत नगरी शेगावात काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक झटपट पैसे मिळवण्याच्या नादात चोरीछुपे अवैध गांजा विक्री करीत आहेत. काल पोलीसांनी जुने बस स्थानक परिसरातून ३ किलो ४०० ग्रॅम गांजा जप्तीची कारवाई केली आहे. इब्राहीम शाह सरदार शाह असे आरोपीचे नाव आहे. शेगाव येथील जुने बस स्थानक परिसरातून शहर पोलिसांनी एकाजवळून गांजा जप्त केला. ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. शेगाव येथील जुने बस स्थानक परिसरात खुलेआम गांजा विकल्या जात होता. त्याबाबतची माहिती शहर पोलिसांना मिळताच पोलिसांनी संबंधितावर पाळत ठेवून बुधवारी गांजा विक्री करणाऱ्या इब्राहीम शाह सरदार शाह (४० वर्षे)



रा.इदगाह प्लॉट ता. शेगांव या युवकास रंगेहाथ पकडले व त्याचेजवळून ३ किलो ४०० ग्रॅम वजनाचा गांजा प्रति किलो २०,००० रुपये प्रमाणे ६८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपीविरूध्द भान्यासंच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलिसांच्या या कारवाईने गांजा विक्रीचा धंदा करणाऱ्यां मध्ये धडकी भरली आहे.

# काँग्रेसचे माजी प्रदेश नेते मोईन काझींसह अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश!



**जनसंचलन/बुलढाणा**

आमदार संजय गायकवाड यांच्या कार्य पद्धतीवर विश्वास ठेवून काल काँग्रेसचे माजी प्रदेश नेते तथा माजी नगरसेवक मोईन काझी यांच्या नेतृत्वात अनेक मुस्लीम कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश घेतला. त्यामुळे हा काँग्रेसला मोठा धक्का समजला जात आहे. २९ ऑक्टोंबर रोजी मुंबई येथे मंत्री उदय सामंत व आमदार संजय गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना शिंदे गटात काँग्रेसचे माजी नगरसेवक मोईन काझी यांच्यासह अब्दूल हमीद, इलियास बेग, इसरार देशमूख, दानीश काझी,सिराज खान, समीर खान पठाण, सांडू बागवान, अनिस सर, मोहम्मद सर यांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश घेतला आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत हा मोठा धक्का समजला जात आहे.

# रिल बनवितांना युवकाचा रेल्वेने कटून मृत्यू!

## आळसणा शिवारातील रेल्वे रूळावरील घटना!

**जनसंचलन/ शेगाव**

रेल्वे लाईनवर उभे राहून रिल बनवतांना एका युवकाचा रेल्वेने कटून मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी ४ वाजता सुमारास घडली. मृतकाचे नाव शे.नदीम शे.रफिक असून तो खामगाव तालुक्यातील पिंपळगाव काळे येथील रहिवासी असल्याचे समजते. तसेच रिल बनवितांना त्याचेसोबत असलेला त्याचा मित्र गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, मृतक शे.नदीम शे.रफिक हा आज दुपारी तालुक्यातील आळसणा गावात लग्नाच्या रिसेप्शनच्या कार्यक्रमात आला होता. त्यावेळी दुपारी ४ वाजता सुमारास त्याला व त्याच्या मित्राला आळसणा गावालगत असलेल्या रेल्वेलाईनवर रिल बनविण्याचा मोह सुटला आणि ते रिल बनविण्यासाठी रेल्वेलाईनवर पोहोचले. दरम्यान रिल बनविण्यात मग्न असताना व कानात हेडफोन लावलेले असल्याने रेल्वे आल्याचे शे.नदीमला कळले नाही आणि तो रेल्वेच्या खाली आला. ज्यामुळे त्याला आपल्या प्राणास मुकावे लागले. दुसरीकडे रिल बनवितांना हजर असलेला नदीमचा मित्र सुध्दा गंभीर जखमी



झाला असून त्याचेवर शेगाव येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती शेगाव ग्रामिण पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी शे.नदीमचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शेगाव येथील शासकीय रूग्णालयात आणला होता. या दुर्दैवी घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पसरताच समाजमन सुन्न झाले असून नदीमच्या मृत्यूबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८